महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ लिमिटेड यांनी नागपूर- गोंदिया प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे बांधकाम पॅकेज - I अंतर्गत नागपूर जिल्हयातील गवसी ते गोंदिया जिल्हयातील लोधी टोला (Ch ०.००० ते Ch १४४.८०७). मुख्य संरेखना व्यतिरिक्त दोन फीडर मार्ग गोंदिया बायपास (Ch ०.००० ते Ch १३.७४४) आणि तिरोडा फीडर मार्ग (Ch ०.००० ते Ch ३.८२६) या प्रकल्पासाठी आवश्यक पर्यावरण विषयक मंजुरीकरीता जाहीर लोकसुनावणीचे दि. २३/०५/२०२५. वेळ दुपारी १२.०० वा चे इतिवृत्त.

*******

केंद्र शासनाच्या वने व पर्यावरण विभागाच्या अधिसूचना दि. 14.09.2006 व सुधारीत अधिसूचना दि. 01.12.2009 तरतूदीनुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ लिमिटेड यांच्या नागपूर- गोंदिया प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे बांधकाम पॅकेज - I अंतर्गत नागपूर जिल्हयातील गवसी ते गोंदिया जिल्हयातील लोधी टोला (Ch ०.००० ते Ch १४४.८०७). मुख्य संरेखना व्यतिरिक्त दोन फीडर मार्ग गोंदिया बायपास (Ch ०.००० ते Ch १३.७४४) आणि तिरोडा फीडर मार्ग (Ch ०.००० ते Ch ३.८२६) या प्रकल्पासाठी आवश्यक पर्यावरण मंजुरीसाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी दिनांक २३/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता, जिल्हा नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा, येथे मा. जिल्हादंडाधिकारी, तथा जिल्हाधिकारी, भंडारा यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. श्रीमती. हेमा देशपांडे, प्रादेशिक अधिकारी, नागपूर हे म.प्र.नि.मंडळाचे प्रतिनिधी तथा लोक सुनावणी समितीचे सदस्य उपस्थित होते व श्री. किशोर पुसदकर, उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा यांनी समन्वयक म्हणून काम केले. सदर जनसुनावणीस श्री. जनार्दन लोंढे, अतिरिक्त जिल्हाधिकारी, भंडारा व श्रीमती स्मिता बेलपत्रे,निवासी जिल्हाधिकारी, भंडारा उपस्थित होते. अध्यक्षांच्या संमतीने दुपारी १२.०० वाजता पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरू केली. पर्यावरण विषयक लोक सुनावणीच्या वेळी उपस्थित असलेल्या लोकांची यादी सोबत जोडलेली आहे. (**सहपत्र**-1).

**पार्श्वभूमी**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी पॅकेज - I अंतर्गत नागपूर जिल्हयातील गवसी ते गोंदिया जिल्हयातील लोधी टोला (Ch ०.००० ते Ch १४४.८०७). मुख्य संरेखना व्यतिरिक्त दोन फीडर मार्ग गोंदिया बायपास (Ch ०.००० ते Ch १३.७४४) आणि तिरोडा फीडर मार्ग (Ch ०.००० ते Ch ३.८२६) पर्यावरण मंजुरीसाठी पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी मंडळास अर्ज सादर केला होता. मंडळाचे मुख्यालयाने पत्र क्रं. MPCB/JD.(WPC)/ENV-PH/B-250106-FTS-0108 date. 06/01/2025, MPCB/JD.(WPC)/ENV-PH/B-250220-FTS-0051 date. 20/02/2025, अन्वये जनसुनावणी प्रक्रिया सुरु करण्याबाबत निर्देश प्रदान केले होते. मा. जिल्हाधिकारी भंडारा यांनी कार्यालयीन टिप्पणी दि. ०२/०४/२०२५ अन्वये दि. २३/०५/२०२५ रोजी दुपारी १२.०० वाजता जिल्हा नियोजन भवन, भंडारा येथे जनसुनावणी घेण्याबाबत मंजुरी प्रदान केली होती.

**प्रयोजन व कार्यपध्दती**

उप-प्रादेशिक अधिकारी, भंडारा तथा संयोजक यांनी अध्यक्षांच्या परवानगीने लोकसुनावणी समितीचे सदस्य व उपस्थितांचे स्वागत करून लोकसुनावणीला सुरवात केली, व जाहिर लोकसुनावणी घेण्याबाबतचा उद्देश व त्याची कार्यपध्दती समजावून सांगितली. त्यानुसार या ठिकाणी परवानगी बाबतचा कोणताही निर्णय घेण्यात येणार नाही, असे स्पष्ट केले. या जाहीर लोक सुनावणीमध्ये घेण्यात येणाऱ्या आक्षेपांची नोंद घेणे व समितीकडे पाठविणे एवढेच काम ही समिती करेल. त्यामुळे उपस्थित जनतेला या प्रकल्पाबाबत त्यांच्या सूचना, टिका, टिप्पणी, निवेदने व आक्षेप लेखी अथवा तोंडी सादर करावयाचे आहेत, त्याची नोंद घेतली जाईल व शासनास पाठविण्यात येईल असे सांगितले.

उप-प्रादेशिक अधिकारी, म.प्र.नि.मंडळ, भंडारा यांनी भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसूचना दिनांक 14 सप्टेंबर 2006 नुसार लोकसुनावणी घेण्याचे प्रयोजन विशद आहे. तसेच त्यामधील तरतुदीनुसार दिनांक १६/०४/२०२५ ला दैनिक द हितवाद (इंग्रजी) व दैनिक लोकमत (मराठी) या दोन मोठ्या प्रमाणात वितरीत होत असलेल्या स्थानिक वृत्तपत्रात या पर्यावरण विषयक लोकसुनावणीबद्दल जाहीर सूचना तिस दिवसांच्या मुदतीसह प्रसिध्द करण्यात आली असल्याचे सांगितले. दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या सुचनांच्या वृत्तपत्र कात्रणाची प्रत सोबत जोडली आहे. (**सहपत्र**-2).

भारत सरकारच्या वने व पर्यावरण मंत्रालयाच्या अधिसुचने प्रमाणे प्रकल्पाची ठळक वैशिष्ठे असलेल्या, पर्यावरण आघात मुल्यनिर्धारण अहवालाच्या संक्षिप्त विवरणाची प्रत व इतर माहिती असलेले कागदपत्रे (इंग्रजी व मराठी मध्ये) विविध सरकारी कार्यालयात तसेच ग्रामपंचायत कार्यालयात नागरीकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आलेले होते. जाहिर सूचना प्रसिध्द झाल्यापासून जाहिर सुनावणीच्या तारखेपुर्वी लोकांकडून लिखीत स्वरूपात सूचना, टीका-टिप्पणी व आक्षेप मागविण्यात आलेले होते. मंडळाचा आदेश क्र. ई-३०/२०२५ पत्र क्र. BO/JD.(WPC)/ENV-PH/B-250421-FTS-0100 date.21/04/2025 नुसार लोक सुनावणी समिती गठीत करण्यात आली. या आदेशाची प्रत सोबत जोडलेली आहे. (सहपत्र-3). सुनावणी पूर्वी एक आक्षेप प्राप्त झाली आहे, प्रत सोबत जोडलेली आहे.

सदर प्रकल्पाबांबत प्रकल्प धारंकानी सादर केलेली कार्यकारी सारांश इंग्रजी आणि मराठीत सॉफ्ट कॉपीसह खालील कार्यालयात लोकांच्या माहितीसाठी आणि अभ्यासासाठी ठेवण्यात आले होते व याबाबत व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत कळविण्यात आले होते.

१. जिल्हाधिकारी कार्यालय, भंडारा.
२. जिल्हा परिषद, भंडारा.
३. जिल्हा उदयोग केंद्र, भंडारा.
४. उपविभागीय अधिकारी, भंडारा, तुमसर, साकोली, जि. भंडारा.
५. तहसिलदार, तहसिल कार्यालय भंडारा, मोहाडी, पवनी, लाखांदुर, जि. भंडारा.
६. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, 5 वा माळा, उद्योग भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर.
७. पर्यावरण व वातावरण बदल विभाग, 15 वा माळा, नवी प्रशासकीय इमारत, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई-32.
८. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, 3 रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.8, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-22.
९. क्षेत्रिय कार्यालय (पश्चिम मध्य क्षेत्र), पर्यावरण, वने व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भू-तल, पुर्व खंड, नवीन सचिवालय भवन, सिव्हिल लाईन्स, नागपूर-01.
१०. ग्रामपंचायत कार्यालय, कोंढी, राजेदहेगाव, परसोडी, नांदोरा, ठाणा, शहापूर, गोपीवाडा, नवेगाव, जख, गुंजेपार, खुर्शीपार, तवेपार, रैनी, पांढराबोडी, शिरसी, दाभा, सावरगाव, लावेश्वर, कोथूर्णा, खैरी, रोहणा खुर्द, ता. भंडारा, जि. भंडारा. पांजरा (बोथली), बेटाळा, रोहा, घाटकुरोडा, मुंढरी (बु), मुंढरी (खु), करडी, उसरीपार, जांभळापाणी, नवेगाव (बु), ता. मोहाडी, जि. भंडारा.

तसेच कार्यकारी सारांश मंडळांचे संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आलेली होती.

प्रकल्प धारकांचे तांत्रीक सल्लागार यांनी तपशिलवार मराठी मध्ये भंडारा जिल्हयातील प्रस्तावित महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ लिमिटेड यांचे नागपूर- गोंदिया प्रवेश नियंत्रित शिघ्रसंचार द्रुतगती महामार्गाचे बांधकाम पॅकेज - I अंतर्गत नागपूर जिल्हयातील गवसी ते गोंदिया जिल्हयातील लोधी टोला (Ch ०.००० ते Ch १४४.८०७). मुख्य संरेखना व्यतिरिक्त दोन फीडर मार्ग गोंदिया बायपास (Ch ०.००० ते Ch १३.७४४) आणि तिरोडा फीडर मार्ग (Ch ०.००० ते Ch ३.८२६) बाबत माहीती, पर्यावरण व्यवस्थापन योजना, व्यावसायीक आरोग्य आणि सुरक्षा व्यवस्थापन, हरित पट्टा विकास योजना, प्रकल्पाचे फायदे, पर्यावरण व्यवस्थापन योजना- खर्च, इत्यादीबाबत सादरीकरण केले.

सादरीकरणा नंतर उप-प्रादेशिक अधिकारी, मप्रनि मंडळ, भंडारा यांनी उपस्थित जनसमुदायाला, सदर प्रकल्पाबाबत काही प्रश्न, सुचना, टिका, टिप्पणी आक्षेप सुचवायचे असल्याचे त्यांनी आपले नांव व गावाचे नांव सांगुन मुद्दे उपस्थित करावे, किंवा लेखी सादर करावे असे आवाहन केले.

**जनसुनावणी दरम्यान चर्चेतील प्रश्न, टीका, टिप्पणी, आक्षेप, सुचना तसेच प्रकल्प धारकाने दिलेली उत्तरे/आश्वासने खालील प्रमाणे आहेत:**

**१) श्री.नरेन्द्र पवनकर, कोर्थुना, जि.भंडारा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | कोर्थुना हे गांव गोसेखुर्द प्रकल्पामुळे बाधीत झालेले आहे. अल्पश्या पुरामुळे २ ते ३ कि.मी.रस्ता बंद होतो ही बाब प्रशासनास माहीत आहे. तसेच हे गांव महामार्गापासुन ५०० ते ६०० मीटर अंतरावर असून पुराचे पाणी गावात येणार. या गावाचे पुर्नवसन करण्यासाठी प्राथमिकता देऊन गावाचे पुर्नवसन करण्यात यावे. महसूल विभागाकडून गावठाणाकरीता गावकऱ्यांना जमिनीचे पट्टे मिळाली परंतु महापुरामुळे घराचे बांधकाम करता येत नाही त्यामुळे ज्यांनी पट्टयाकरीता पैसे भरले त्यांना मोबदला देण्यात यावा. या महामार्गामुळे शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्या-येण्यासाठी रस्ता राहणार नाही. पर्यायी रस्ता तयार करून दयावा. | **श्री. भूषण मालखंडाळे (कार्यकारी अभियंता)**<br>1. हा मार्ग उंच व सरळ बांधण्यात येईल. सर्व रस्ते, नाले, लहान प्रवाह आवश्यक उंचीसह संबंधीत विभागाचे मान्यते प्रमाणे पुन्हा उभारण्यात येईल. सिंचन कालवे बाधीत होणार नाही. गोसेखुर्द प्रकल्पामध्ये बाधीत झालेले गांव या विभागासी संबंधित नाही.<br>2. भुमि अधिग्रहणाबाबत असलेली शंका यासाठी असलेली स्वतंत्र यंत्रणेकडे मांडू शकता.<br>3. महाराष्ट्र शासनाच्या प्रचलित दरा नुसार मोबदला देण्यात येईल. |

**२) श्री.पुरूषोत्तम कांबळे, सरपंच, ग्रा.पं. ठाणा, जि.भंडारा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायतद्वारे नागरी घन कचरा प्रक्रिया केंद्र उभारलेला असून तो कार्यान्वीत आहे. द्रुतगती महामार्गामुळे हा प्रकल्प बाधित होत असल्यामुळे, जागा अधिग्रहीत करुन प्रकल्प स्थानांतरीत करुन कार्यान्वित देण्यात यावा. | अधिग्रहीत करण्यात आलेली जमीन, त्यावरील बांधकाम व अनुशंगीक गोष्टी याबाबत शासकीय दराप्रमाणे मोबदला देण्यात येतो. |

**३) श्री.विनायक टांगले, सरपंच, ग्रा.पं.गोपीवाडा, जि.भंडारा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | महामार्गामध्ये शेतकऱ्यांची शेती जात असल्याने मोबादला किती मिळणार आहे, याबाबत शेतकऱ्यांना माहिती देण्यात यावी. | याबाबत माहीती देण्यात आली आहे. |

**४) श्री.नरेश ईश्वरकर,खैरी सदस्य, ग्रा.पं.बेटाळा, जि.भंडारा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | काही शेतकऱ्यांच्या जमीनी मधोमध मार्ग जात असल्याने रस्त्यांच्या दोन्ही भागातील शेती करणे अडचण होणार आहे त्यामुळे उरलेल्या शेतजमिनीचा महामार्ग मोजणीमध्ये समाविष्ट करुन त्याचा मोबदला देण्यात यावा. तसेच ज्या शेतामध्ये विहीर, | • ज्या प्रमाणात शेती जात आहे त्या प्रमाणात मोबदला देण्यात येईल.<br>• प्रकल्पामध्ये जेवढी शेतजमीन जात आहे त्याचाच मोबदला देण्यात येईल. प्रकल्पाचे दोन्ही बाजुस सलग मार्ग व भूयारी मार्ग |

| | | |
|---|---|---|
| | पंप व गोठे आहेत त्याचा किती मोबदला देणार याची माहिती दयावी. जे शेतकरी पूर्णपणे भूमिहीन होणार असल्याने त्यांच्यासाठी काय उपाययोजना करणार. वरील बाबीकरीता उप-विभागीय अधिकारी, भंडारा यांना निवेदन सादर केलेले आहे. | प्रस्तावित असल्याने दोन्ही बाजुस शेती वहिवाटीकरीता जाता येईल. |

**५) श्री.पदमाकर चकोले, पांढराबोडी, जि.भंडारा**

| अ. क्र. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्पधारक यांनी दिलेली उत्तरे/अभिप्राय |
|---|---|---|
| १ | पांढराबोडी हे गांव पेंच प्रकल्पाच्या कालव्याच्या सिंचनाखाली आहे. या महामार्गामुळे सिंचन व्यवस्था बाधित होईल याची काय व्यवस्था करणार. तसेच शेतकऱ्यांना शेतामध्ये जाण्यासाठी रस्ता बांधण्यात यावा. आमचे गाव नगरपरिषद क्षेत्रालगत असल्याने मोबदल्याचे मुल्यांकन कळविण्यात यावे. याबाबत उप-विभागीय अधिकारी, भंडारा यांना निवेदन सादर केलेले आहे. | सिंचनाचे कालवे बाधित होणार नाही आहे तसेच पूर्ववत राहतील. |

**मा. अध्यक्ष लोकसुनावणी समिती**

आज या महामार्गाचा पॅकेज -I पर्यावरण विषयक जन सुनावणी आयोजित केली होती, आपण सर्वजण उपस्थित झालात याबाबत आभार व्यक्त करतो. पायाभुत सुविधासाठी भुसंपादन करणे व प्रक्रियेसाठी सर्व भागधारकाशी चर्चा करणे आवश्यक आहे. व्यक्त केलेल्या भावनांची नोंद करण्यात आली आहे. आक्षेप समितीकडे पाठविण्यात येईल व प्रक्रियेमध्ये काळजी घेण्यात आली आहे की नाही त्याची तपासणी होऊन त्यावर निर्णय होईल. भुसंपादनाविषयी महाराष्ट्र राज्य विकास महामंडळातर्फे विस्तृत माहीती दिलेली आहे. भूसंपादन प्रक्रियेमध्ये खातेदारास प्रत्येक टप्प्यामध्ये सामावून घेतले जाते व त्या पुढे होणार. भुसंपादनाबाबत महाराष्ट्र राज्य रस्ते विकासमहामंडळ सकारात्मक आहे. पुढच्या पिढयाना विकासाची संधी मिळेल. याकडे सकारात्मकतेने पाहिले पाहिजे. या महामार्गामुळे पुर्व विदर्भाला जोडण्याची संधी तसेच औद्योगिक विकासासाठी उपयोगी होईल. प्राप्त सर्व सुचनांची नोंद घेण्यात आलेली आहे व वृत्तात समितीकडे सादर करण्यात येईल.

आभार व्यक्त करुन जनसुनावणी संपन्न झाल्याचे जाहीर करण्यात आले.

**(किशोर पुसदकर)**
**उप-प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, भंडारा व**
**समन्वयक, लोक सुनावणी समिती**

**(हेमा देशपांडे)**
**प्रादेशिक अधिकारी,**
**म.प्र.नि.मंडळ, नागपूर व**
**सदस्य, लोक सुनावणी समिती**

**(संजय कोलते भा.प्र.से.)**
**जिल्हाधिकारी, व**
**अध्यक्ष, लोक सुनावणी समिती**